# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:igatpuri.amfu@gmail.com**


**२८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१०.०७.२०२६ जिल्हा: नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०४/०७/२०२६ ते १०/०७/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (११/०७/२०२६ ते १५/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | दिनांक | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| ६९.६ | ७८.२ | १४०.९ | २४४.४ | २००.५ | ३५.४ | १.२ | पाऊस (मिमी) | ४ | ५ | ३ | ३ | ४ |
| २३.० | २३.० | २४.० | २४.२ | २३.३ | २४.५ | २६.७ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३० | ३१ | ३२ | ३१ |
| २२.० | २१.५ | २२.० | २१.७ | २२.० | २३.२ | २३.४ | किमान तापमान (अं.से.) | २४ | २४ | २३ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९८ | ९८ | ९९ | ९९ | ९९ | ९२ | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ७४ | ७५ | ७५ | ७५ |
| ९८ | ९६ | ९७ | ९८ | ९६ | ८४ | ८७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ६९ | ७० | ६५ | ७१ |
| ५.८ | ५.९ | ६.८ | ८.२ | ५.७ | ८.१ | ९.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २२.६ | २६.२ | ३०.१ | २८.६ | २५.५ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात तुरळक हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहिल. कमाल तापमान ३०-३२ डिग्री सें. व किमान तापमान २३-२४ डिग्री सें. दरम्यान राहण्याची श.क्यता आहे. तसेच वा-याचा वेग २२.०-३०.० कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता/इशारा:** | | **इशारा नाही** |
| **सामान्य सल्ला** | | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता नासिक जिल्ह्यात पेरणी योग्य पाऊस पडलेल्या ठिकाणी जसे पश्चिम घाट विभाग (इगतपुरी, त्रेम्बकेश्वर) व उपपर्वतीय विभाग (सुरगाणा व नाशिकचा काही पश्चिम भाग) नागली, वरई पिकांची रोपवाटिकेत पेरणी सुरु ठेवावी. तसेच पूर्वेकडील अवर्षण प्रवण व मैदानी विभाग जसे (सिन्नर, देवळा, सटाणा, नांदगाव, येवला, पूर्व नाशिक, चांदवड, निफाड, कळवण व दिंडोरी) ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला आहे म्हणून खरीप पिकांची पेरणी सुरु ठेवावी.<br>पेरणी केलेल्या क्षेत्रात नांगे भरावीत.<br>खरीप पिकांच्या पेरणीसाठी घरचे बियाणे वापरावयाचे असल्यास बियाणेची उगवण क्षमता तपासावी.<br>आता पेरणी सुरु करणाऱ्या शेतकरी बांधवाना (पूर्वेकडील अवर्षण प्रवण व मैदानी विभाग) सल्ला देण्यात येतो कि शक्य असल्यास कमी कालावधीच्या व कमी पाण्यावर येणाऱ्या वाणाचा वापर करावा. तसेच आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.<br>पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी (शेततळे, कंपार्टमेंट बंडिंग, सरी-वरंबा पद्धत इ.)उपाय योजना करावी. |
| **संदेश** | | **तुरळक हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता सल्ला देण्यात येतो की ज्या ठिकाणी लवकर पेरणी झाली असेल त्या ठिकाणी शेत तणमुक्त ठेवावे.** |
| **भात** | पेरणी व रोपवाटिका व्यवस्थापन | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता आता पेरणी सुरु करणाऱ्या शेतकरी बांधवाना सल्ला देण्यात येतो कि रहू पद्धतीने (रहूसाठी ८० ते १०० किलो प्रति हेक्टरी बियाणे वापराव) भात लागवड करावी. रोपवाटिकेत हळव्या जातीचे (कमी कालावधीचे) व सुधारित जातीचे बियाणे पेरावे.<br>रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी १५ मिली ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. १० लिटर पाण्यात पेरणीनंतर दोन ते तीन दिवसात फवारावे अथवा ब्युटाक्लोर ५० ई.सी १.५ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी फवारण्यात यावे.<br>खेकड्यांच्या बिळाशेजारी विषारी आमिष ठेवून खेकड्यांचे नियंत्रण करता येते यासाठी एसिफेट ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (७५ ग्रॅ.) घेऊन १ कि. ग्रॅ. शिजवलेल्या भातामध्ये मिसळावे. या अमिषाचे १०० लहान – लहान गोळे करून खेकड्यांच्या बिळात टाकावेत. |
| **नाचणी /नागली व वरई** | पेरणी | पेरणी योग्य पाऊस पडलेल्या ठिकाणी (जुलै चा दुसरा पंधरवडा पर्यंत) खरीप हंगामासाठी रोपवाटिकेसाठी बियाण्याची पेरणी गादीवाफ्यावर सुरु करावी.<br>पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता शेतक-यांनी नागली व वरई पिकाची रोपवाटिका ८ दिवसांच्या अंतराने २ टप्प्यात तयार करावी.<br>बीजप्रक्रिया: बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरीलम ब्रासिलेन्स आणि ॲस्परजिलस अवोमोरी या जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. या बीजप्रक्रियेमुळे १० ते १५ % उत्पादनात वाढ होते. |
| **खुरासणी** | पेरणी | हंगामात खुरासणी पिकाची पेरणी (१५ जुलै पर्यंत ) सुरु ठेवावी. ४-५ किलो प्रति हेक्टरी (बियाण्याच्या आकाराची वाळू घेऊन बियाण्यात १:३ या प्रमाणात मिसळून पेरणी करावी). ३० x १० सें.मी. (दोन ओळीतील अंतर ३० सें. मी. ठेऊन नांगराच्या मागे बी टाकून अगर तिफन / पाभरीने पेरणी करावी. |
| **मका** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता खरीप हंगामात मक्याची पेरणी १५ जुलै पर्यंत पूर्ण करावी.<br>खरीप हंगामात मका पिकाची पेरणी सपाट वाफ्यांमध्ये टोकण पद्धतीने ४–५ सें.मी. खोलीवर करावी. उशिरा व मध्यम कालावधीच्या जातींसाठी ७५ × २० सें.मी., तर लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० × २० सें.मी. अंतर ठेवून १५–२० कि.ग्रॅ. बियाणे प्रति हेक्टर वापरावे.<br>पेरणीनंतर पावसाची उघडीप असताना ॲट्राटॉप ५०% हे तणनाशक २.५ कि.ग्रॅ./हेक्टर प्रमाणात जमिनीवर फवारावे. |
| **सोयाबीन** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता बीजप्रक्रिया केलेल्या सोयाबीनची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. १५ जुलै नंतर पेरणी केल्यास उत्पादनात मोठी घट होते. पेरणी ४५ × ५ सें.मी. अंतरावर व बियाणे ४ सें.मी.पेक्षा खोल न पडेल याची काळजी घ्यावी. मध्यम ते भारी जमिनीत सोयाबीन : तूर आंतरपीक ३:१ किंवा ४:२ प्रमाणात घेतल्यास, उशिरा पेरणीमध्येही अधिक उत्पादन मिळण्यास मदत होते. |
| **भुईमुग** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता खरीप हंगामात १५ जून ते १५ जुलै दरम्यान भुईमुगाची पेरणी बीजप्रक्रिया करून करावी. पाभरी किंवा टोकण पद्धतीने ३० × १० सें.मी. अंतर ठेवून पेरणी करावी. बियाणे व रोपावस्थेतील रोगांपासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. |
| **बाजरी** | पेरणी | जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पाऊस व पावसाचा अंदाजलक्ष्यात घेता शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार खरीप हंगामात बाजरीची १५ जुलै पर्यंत पूर्ण करावी.<br>खरीप हंगामात पेरणी सरी-वरंबा किंवा सपाट वाफा पद्धतीने २–३ से.मी. खोलीवर करावी. कोरडवाहू भागात ४५×१५ से.मी. व सिंचनाखाली ३०×१५ से.मी. अंतर ठेवून ३–४ कि.ग्रॅ. बियाणे/हे. वापरावे.<br>पेरणीपूर्वी बियाण्यास योग्य बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| द्राक्ष | | पावसाळ्यात भारी जमिनीत पाणी साचल्यामुळे वाफसा मिळत नाही. त्यामुळे द्राक्षवेलीच्या मुळांची वाढ खुंटते, मुळे काळी पडून कुजतात, शेंडा वाढ थांबते, पाने पिवळी पडून पानगळ होऊ शकते. अशा परिस्थितीत वेल बचावासाठी खोड व काड्यांवर एरियल मुळे तयार करते. पाणी ओसरून वाफसा आल्यावर जमिनीत पुन्हा पांढरी, कार्यक्षम मुळे तयार होतात. मात्र हा कालावधी वाढल्यास घड विकास व अन्नद्रव्य साठवण प्रक्रियेवर परिणाम होतो. त्यामुळे पाणी साचणाऱ्या बागेत दोन ओळींमध्ये चारी काढून पाण्याचा निचरा करावा तसेच लागवडीपूर्वी बागेला २–३% उतार देण्याची शिफारस आहे. |
| डाळिंब | | डाळिंब बागांमध्ये पाणी साचले असल्यास ते बागेबाहेर काढणे आवश्यक आहे. त्याकरिता पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य पध्दतीने चर काढावेत. पाणी साचून राहिल्यामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येईल.<br>डाळिंब बागांचे सोसाट्याच्या वाऱ्यापासून संरक्षण करण्याकरिता बांबू किंवा लाकडी काठ्याचा आधार द्यावा. प्लॅस्टिक दोरीच्या साह्याने झाडे एकमेकांना बांधून घ्यावीत. |
| आंबा | | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता आंबा बागेतील जास्तीचे पाणी काढून टाकावे व जमिनीवर पडलेला काडीकचरा, पालापाचोळा व खराब / सडलेली फळे गोळाकरून नष्ट करून बागेला स्वच्छ ठेवावे. |
| खरीप कांदा | पेरणी | कांदा रोपवाटिकेसाठी उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. रोपवाटीका ही गादी वाफे तयार करून बियाणे फोकुन न टाकता सरळ रेषेत पेरणी करावी. पेरणी करतांना मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी फुले सुपर बायोमिक्स किंवा फुले ट्रायकोडरमा चा वापर करावा. |
| टोमॅटो | | <u>पावसाळी टोमॅटो पुनर्लागवड</u><br>शेतामध्ये सऱ्या पाडून जमिनीच्या उतारानुसार वाफे तयार करून घ्यावेत. टोमॅटोची रोपे तयार झाल्यानंतर लागवडीच्या वाफ्यांना आठवड्यापूर्वी पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी. लागवडीच्या दिवशी वाफ्यांना पुन्हा पाणी द्यावे. वाफ्यांमध्ये पाणी असतानाच ओल्यातच रोपांची लागवड करावी.<br>पुनर्लागवडीपूर्वी रोपवाटिकेमध्ये साधारणतः एक आठवडा अगोदर पाण्याची मात्रा हळूहळू कमी करावी. म्हणजे रोपे कणखर होतात. लागवडीसाठी वाफ्यातून रोपे काढण्यापूर्वी एक दिवस आधी वाफ्यांना पाणी द्यावे. त्यामुळे रोपांची मुळे न तुटता रोपे सहज निघतात. |
| पशुधन (गाय व म्हैस) | | <u>पशुधनाचे व्यवस्थापन</u><br>पावसाळ्यात गोठ्याची डागडुजी करून स्वच्छता व हवेशीर वातावरण राखावे. गाभण व दुभत्या जनावरांसाठी कोरडा, उबदार व आरामदायी निवारा उपलब्ध करून द्यावा. ओलसर जमिनीमुळे घसरणे व खुरांना इजा होण्याची शक्यता असल्याने खुरांची नियमित तपासणी करावी. हिरव्या चाऱ्यासाठी ज्वारी, बाजरी, मका तसेच बहुवार्षिक चाऱ्याची पिके जसे यशवंत व मेथीघास यांना प्राधान्य द्यावे. |
| शेळी | | <u>जुलै–ऑगस्टमधील शेळ्यांचे व्यवस्थापन</u><br>शरीरावरील परजीवींचे नियंत्रण व नवीन करडांचे जंतनिर्मूलन करावे. सर्व शेळ्यांना आंत्रविषार, पी.पी.आर. व धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण करावे. पैदासक्षम शेळ्यांचा खुराक वाढवून पैदाशीच्या बोकडांची तयारी करावी. एकाचवेळी गाभण करण्याचे नियोजन असल्यास माज ओळखण्यासाठी 'टीझर बोकड' गोठ्यात ठेवावा. |
| कुक्कुटपालन | | पावसाळ्यात पिण्याचे पाणी दूषित होण्याची शक्यता असल्याने कोंबड्यांना स्वच्छ व निर्जंतुक पाणी द्यावे. पाण्यात योग्य प्रमाणात क्लोरिन/ब्लिचिंग पावडर मिसळावी, पाण्याची टाकी स्वच्छ व झाकलेली ठेवावी आणि तिची नियमित देखभाल करावी. |

- **<u>पेरणी करिता उशीर झाल्यास विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या आपात्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा उपयोग करावा. तसेच उशिरा पेरणीसाठी पर्यायी बियाणे उपलब्ध ठेवणे.</u>**
- **<u>विद्यापीठाद्वारे उत्पादित केली जाणारी जैविक खते (Bio-fertilizer) बीज प्रक्रियेसाठी अत्यंत प्रभावी आणि फायदेशीर आहेत त्यांचा वापरामुळे पिकांची उगवण क्षमता वाढते, पिकांना पोषक घटक मिळतात आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो.</u>**

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी
**दिनांक** : १०.०७.२०२६

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**